स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड. मानवविद्या शाखेअंतर्गत
राज्यशास्त्र विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी
सादर करावयाचा संशोधनाचा प्राथमिक आराखडा.

"भारतीय संविधान दुरुस्तीचा चिकित्सक अभ्यास"
[विशेष कालखंड - 1951 ते 2021]

संशोधक

चौरे विष्णू दुर्गाजी

एम.ए., सेट (राज्यशास्त्र).

मार्गदर्शक

प्रा.डॉ. प्रताप वामनराव पाटील

एम.ए., बी.एड.,एम.फिल., पीएचडी.
सहयोगी प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
बहिर्जी स्मारक महाविद्यालय वसमत,
ता. वसमत, जि. हिंगोली.

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड.

डिसेंबर 2022

1.1 प्रस्तावना

भारताच्या स्वातंत्र्याच्या अगोदर देशात वेगवेगळया सत्ता येऊन गेल्या होत्या. अनेक साम्राज्यांनी भारतीय प्रदेशावर आक्रमण केले आणि बहुतांश परकीय साम्राज्य भारतीय परिस्थितीशी एकरूप झाले, परंतु युरोपीय सत्ताधीश मात्र भारतीय परिस्थितीशी एकरूप होऊ शकले नाही,ते भारतीय भूमीचा वापर केवळ आपल्या उत्पादन फायद्यासाठी करत होते. ब्रिटिशांनी वसाहतीक राजवटीच्या माध्यमातून भारतावर अनेक वर्ष नियंत्रण प्रस्थापित केले.

15 ऑगस्ट 1947 ला भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्याबरोबरच भारतासमोर अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. भारतात स्वातंत्र्याच्या अगोदरपासूनच संविधान निर्मितीची प्रक्रिया सुरू झालेली होती. स्वातंत्र्यानंतर संपूर्ण प्रदेशाचे भारत आणि पाकिस्तान या दोन देशात विभाजन झाले होते. संविधान सभेच्या माध्यमातून भारतासाठी एक कायदा बनवण्याची प्रक्रिया चालू होती, यासाठी काही समित्या सुद्धा स्थापन करण्यात आल्या आहेत. (उदा. मसुदा समिती) डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे सहकारी यांनी मिळून संविधानाचा कच्चा मसुदा बनवला, जो संविधान सभेच्या मान्यतेनंतर 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय संविधान भारतीय लोकांच्या वतीने स्वतः प्रत अर्पण केले आणि 26 जानेवारी 1950 पासून भारतीय संविधानाची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी सुरू झाली. बदलत्या परिस्थितीनुसार संविधानात आतापर्यंत 105 दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. प्रस्तुत संशोधनात या संविधान दुरुस्तीचा चिकित्सक अभ्यास करण्यात येणार आहे.

भारतीय संविधान हे संसदीय शासन व्यवस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. लोकशाही शासन व्यवस्था चांगल्या पद्धतीने प्रस्थापित व्हावी यासाठी भारतीय संविधानाची योग्य अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, कारण एखाद्या देशाचा कायदा कितीही चांगला असला तरी त्या कायद्याची अंमलबजावणी करणारे लोक कसे आहेत, त्यावर त्या कायद्याचे भवितव्य अवलंबून असते. त्यामुळे संविधानाची आणि संविधान दुरुस्त्यांची योग्य अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधनात भारतीय संविधान दुरुस्तीचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी वेगवेगळ्या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. त्यामध्ये संशोधनाची समस्या, उद्दिष्टे, महत्त्व, व्याप्ती व मर्यादा यांचा सखोल अभ्यास करण्यात येणार आहे.

भारतीय संविधान निर्मितीच्या प्रक्रियेवर ब्रिटिशकालीन कायदे तसेच इतर वेगवेगळ्या देशाच्या संविधानाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. भारतीय संविधान निर्माण होत असताना संविधान सभा स्थापन करण्यात आलेली होती. संविधान सभेमध्ये वेगवेगळ्या सदस्यांनी आपली महत्त्वाची भूमिका मांडल्याची दिसते. त्यानंतर मसुदा समितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाचा कच्चा मसुदा बनवून त्यावर अनेक चर्चा संविधान सभेत झाल्या, म्हणून प्रस्तुत विषयाचा अभ्यास करणे क्रम प्राप्त ठरते.

प्रस्तुत विषयाच्या माध्यमातून भारतीय समाज व्यवस्थेवर कशा पद्धतीने प्रभाव पडलेला आहे, याचा अभ्यास करण्यात येणार आहे. भारतीय समाज व्यवस्थेतील कुटुंब व्यवस्था, जाती व्यवस्था, ग्रामीण समुदाय यांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

संविधानाच्या अंमलबजावणीपासून आतापर्यंत एकूण 105 संविधान दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. प्रस्तुत संशोधनात या संविधान दुरुस्तीचे अध्ययन करण्यात येणार आहे.

1.2 संशोधन समस्या

सदरील संशोधन विषय निवडताना भारतीय संविधान दुरुस्तीचा अभ्यास करणे गरजेचे वाटते.संविधानाच्या अंमलबजावणीपासून आजपर्यंत संविधानामध्ये अनेक दुरुस्त्या करण्यात आल्या, पण त्या दुरुस्त्यांची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही (उदा. 42 व्या संविधान दुरुस्तीने धर्मनिरपेक्ष हा शब्द संविधानात टाकण्यात आला. परंतु त्याची योग्य अंमलबजावणी न झाल्यामुळे धर्मांधता अधिक वाढल्याची दिसून येते म्हणून संविधान दुरुस्तीच्या अंमलबजावणीकडे विशेष लक्ष द्यावे लागेल, म्हणून संशोधनासाठी "भारतीय संविधान दुरुस्तीचा चिकित्सक अभ्यास" (विशेष कालखंड- 1951 ते 2021) हा विषय निवडला आहे.

1.3 संशोधन विषयाचे महत्त्व

भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे विस्तृत आणि वैशिष्ट्यपूर्ण संविधान आहे यामध्ये देशाच्या राजकीय व्यवस्थेबरोबरच मूलभूत हक्क, मार्गदर्शक तत्वे, मूलभूत कर्तव्य यांचा समावेश केलेला आहे. देशाची सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थिती आणि देशाच्या गरजेनुसार संविधानात बदल केला जातो. संविधानात केलेल्या बदलाचा किंवा दुरुस्तीचा देशाच्या सार्वजनिकच नव्हे तर व्यक्तीच्या खाजगी जीवनावरही दीर्घकालीन परिणाम होतो. म्हणून काळानुसार संविधान दुरुस्ती करणे आवश्यक असते. पुढील मुद्द्यांच्या आधारे संशोधन विषयाचे महत्त्व लक्षात येते.

1) संविधानाच्या कलम 368 मध्ये दिलेल्या तरतुदीनुसार संविधानात दोन प्रकारे दुरुस्ती केली जाते.

अ) संसदेच्या विशेष बहुमताने.

ब) संसदेच्या विशेष बहुमताबरोबरच निम्म्या घटक राज्यांच्या साध्या बहुमताने.

2) संविधानाच्या काही तरतुदीमध्ये संसदेच्या साधा बहुमताने दुरुस्ती केली जाते.

3) संविधान दुरुस्तीच्या माध्यमातून देशातील नागरिकांचे सामाजिक, आर्थिक व राजकीय अधिकार जपले जातात.

4) संविधान दुरुस्तीच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना संविधानिक दर्जा प्राप्त झाला.

5) संविधान दुरुस्तीद्वारे देशाच्या राजकीय प्रक्रियेत बदल केले जातात. (उदाहरणार्थ मतदारांचे वय 21 वरून 18 वर्षे केले)

6) संविधान दुरुस्तीच्या माध्यमातून समता विरोधी व परिस्थितीनुसार अनावश्यक बनलेले घटक रद्द करणे.

7) देशातील नागरीकांसाठी मूलभूत हक्कांबरोबरच मूलभूत कर्तव्यांचा समावेश संविधान दुरुस्तीने केला.

1.4 संशोधनाची व्याप्ती आणि मर्यादा.

प्रस्तुत संशोधन हे संविधानात करण्यात येणाऱ्या दुरुस्ती संदर्भात मर्यादित आहे. संविधानातील कोणत्या भागात दुरुस्ती करता येते ही दुरुस्ती करताना लोकसभा, राज्यसभा, घटकराज्य, राष्ट्रपती आणि न्यायव्यवस्था यांच्या कार्याचा/ भूमिकेचा अभ्यास प्रस्तुत संशोधनात करण्यात येणार आहे.

1.5 संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनासाठी या विषयाच्या अनुषंगाने उद्दिष्टे खालीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

1) संविधान दुरुस्ती प्रक्रियेतील संसदीय व्यवस्थेचा आढावा घेणे.

2) संविधान दुरुस्ती संदर्भातील ऐतिहासिक घटनांचा आढावा घेणे.

3) संविधान दुरुस्ती प्रक्रियेवरील न्यायव्यवस्थेच्या भूमिकेचा आढावा घेणे.

4) 1951 ते 2021 दरम्यान झालेल्या संविधान दुरुस्त्यांचा आढावा घेणे.

5) भारतीय संविधानातील संरचनात्मक भागाचा (Structural part) अभ्यास करणे.

6) संविधान दुरुस्तीच्या संदर्भाने राष्ट्रपतीच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

7) संविधान दुरुस्तीच्या प्रक्रियेतील घटक राज्यांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.

8) भारतीय संविधानातील संविधान दुरुस्तीच्या प्रकारांचा आढावा घेणे.

9) भारतीय संविधान दुरुस्ती प्रक्रियेवर पडलेल्या प्रभावाचे अध्ययन करणे.

10) स्थानिक स्वराज्य संस्थेसंदर्भातील संविधान दुरुस्तीचे अध्ययन करणे.

1.6 संशोधनाची गृहितके

1) भारतीय संविधानावर अनेक देशाच्या संविधानाचा प्रभाव पडलेला आहे.

2) न्यायव्यवस्थेच्या माध्यमातून संविधान दुरुस्तीवर नियंत्रण ठेवले जाते.

3) बदलत्या परिस्थितीनुसार भारतासमोरील आव्हानांचा सामना करण्यासाठी संविधान दुरुस्ती केली जाते.

4) भारतीय संविधानामुळे देश अखंड आहे.

5) संविधान दुरुस्ती प्रक्रियेवर कनिष्ठ सभागृहाचे म्हणजेच लोकसभेचे वर्चस्व आहे.

6) 73 व 74 व्या संविधान दुरुस्तीमुळे देशातील पंचायत राज व्यवस्था घटनात्मक दृष्ट्या अधिक सक्षम झाली आहे.

1.7 संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनात "भारतीय संविधान दुरुस्तीचा चिकित्सक अभ्यास"(विशेष कालखंड-1951 ते 2021) हा संशोधन विषय निवडला असून यात संविधान दुरुस्ती प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या घटकांचा अभ्यास करण्यासाठी तसेच तत्कालीन परिस्थितीमध्ये संविधान दुरुस्ती प्रक्रियेवर पडणारा प्रभाव आणि त्या संविधान दुरुस्तीचे होणारे परिणाम अभ्यासण्यासाठी सर्वसाधारणपणे सामाजिक शास्त्रात वापरल्या जाणाऱ्या संशोधन पद्धतीचा वापर केला जाणार आहे. त्यामध्ये वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा वापर प्रस्तुत प्रबंधासाठी करण्यात येणार आहे.

1) प्राथमिक स्त्रोत :

भारतीय संविधान दुरुस्तीचा चिकित्सक अभ्यास विशेष कालखंड 1951 ते 2021 करत असताना संविधान दुरुस्तीदरम्यान संसदेमधील झालेली चर्चा, संसदीय कामकाजाची कागदपत्र तसेच संसद सदस्य व कायदे तज्ञांनी लिहिलेले व ग्रंथांच्या आधारे प्राथमिक तथ्य संकलन करण्यात येणार आहे .

2) दुय्यम स्त्रोत :

तथ्य संकलन करत असताना दुय्यम स्त्रोतांमध्ये भारतीय संविधान दुरुस्तीच्या संदर्भाने वर्तमानपत्रातील लेख, विविध मासिके, वार्षिक अंक, इंटरनेटवरील माहिती, इत्यादी द्वारे तथ्य संकलन करण्यात येणार आहे.

1.8 संशोधन आराखडा

"भारतीय संविधान दुरुस्तीचा चिकित्सक अभ्यास"(विशेष कालखंड- 1951 ते 2021) या शीर्षकानुसार केलेले लिखाण अधिक सुव्यवस्थित होण्यासाठी अहवाल लेखन करताना प्रस्तुत संशोधनाची विभागणी पुढील सहा प्रकरणांमध्ये केली आहे.

प्रकरण पहिले : संशोधन पद्धती.

प्रबंधाच्या प्रस्तुत पहिल्या प्रकरणात संशोधनाची समस्या, संशोधनाचे उद्दिष्टे, महत्त्व, व्याप्ती व मर्यादा, संशोधन पद्धती, गृहीतके इत्यादी घटकांचे विवेचन करण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : भारतीय संविधानावर पडलेला प्रभाव.

प्रबंधाच्या दुसऱ्या प्रकरणात वरील शीर्षकानुसार प्रस्तावना विषद करून भारतीय संविधानाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि भारतीय संविधान निर्माण करत असताना इतर देशांचा त्यावर पडलेला प्रभाव यांचे अध्ययन करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : भारतीय संविधानाच्या निर्मितीची पार्श्वभूमी.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या तिसऱ्या प्रकरणात प्रस्तावना व संविधान निर्मितीची पार्श्वभूमी अभ्यासली जाणार आहे. यामध्ये संविधान सभेची निवड आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मसुदा समिती आणि इतर समित्यांच्या संदर्भात अध्ययन केले जाणार आहे

प्रकरण चौथे : भारतीय समाजजीवन आणि संविधान.

प्रस्तुत शोधप्रबंधाच्या चौथ्या प्रकरणात भारतातील समाजजीवन(कुटुंब व्यवस्था, जाती व्यवस्था, ग्रामीण व्यवस्था) आणि संविधान यांच्या संदर्भात सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : भारतीय संविधानातील दुरुस्त्या.

1951 पासून ते 2021 पर्यंत संसदेच्या माध्यमातून भारतातील बदलत्या परिस्थितीनुसार संविधान दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत. आजपर्यंत एकूण 105 संविधान दुरुस्त्या केल्या आहेत, त्यांचा सविस्तर अभ्यास यामध्ये करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : सारांश व निष्कर्ष.

"भारतीय संविधान दुरुस्तीचा चिकित्सक अभ्यास" (विशेष कालखंड- 1951 ते 2021) करण्यासाठी वेगवेगळया संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. भारतीय संविधानावर आणि संविधान दुरुस्ती प्रक्रियेवर पडलेला प्रभाव आणि त्यांचे परिणाम यांचा देखील अभ्यास केला जाणार आहे. संविधान दुरुस्तीसंदर्भात मांडलेल्या गृहीतकृत्याचे योग्य विश्लेषण करून त्या संदर्भात निष्कर्ष मांडण्यात येणार आहे. भारतातील सामाजिक व्यवस्थेचे संवैधानिक दृष्टिकोनातून विश्लेषण देखील करण्यात येणार आहे. तसेच गृहीतकृत्याची पडताळणी करून शिफारसी मांडावयाच्या आहेत. शेवटी संदर्भ सुची लावायची आहे.

संदर्भ ग्रंथ :

1. डॉ.दा.धो. काचोळे, "भारतीय समाजरचना" , कैलास पब्लिकेशन्स औरंगपुरा, औरंगाबाद.

2. डॉ. अशोक चौसाळकर, "धर्म, समाज आणि राजकारण" प्रकाशक :- प्रकाश विश्वासराव लोकवाङ्मय ग्रह, भूपेश गुप्ता भवन 85 सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई.

3. प्रा. के.आर.बंग, "महाराष्ट्र शासन व राजकारण",

प्रकाशन :- शशिकांत पिंपळापुरे, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा,औरंगाबाद.

4. डॉ.प्रदीप आगलावे, "सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे" ललिता पुराणिक श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

5. रंजन कोळंबे , "भारतीय राज्यघटना आणि प्रशासन", भगीरथ प्रकाशन, पुणे.

6. एम. लक्ष्मीकांत, "इंडियन पॉलीटी" , Mc Graw Hill Education.

7. लोकसत्ता आणि महाराष्ट्र टाईम्स यामधील संविधान आणि संविधान दुरुस्ती संदर्भात आलेल्या लेखांचा अभ्यास.

*** मार्गदर्शक ***

*** संशोधक ***

चौरे विष्णू दुर्गाजी

एम.ए.,सेट (राज्यशास्त्र)

प्रा.डॉ.पी.डब्ल्यू.पाटील.

एम.ए., बी.एड.,एम.फिल., पीएचडी.

बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत,

ता.वसमत, जी. हिंगोली